# कलचाचणीतून विद्यार्थ्याला 'स्व' ची ओळख

- प्रा.विजयकुमार पाईकराव, नाशिक, संपर्क - ९४०३७७४५२९

प्रगत महाराष्ट्र मार्गक्रमणाचा पहिला टप्पा म्हणजे इयत्ता दहावीच्या विद्यार्थी-पालकांना कलचाचणीतून 'स्व' ची ओळख करून देणे हा होय. प्राचीन काळापासून आजतागायत शिक्षणाची शाश्वत व्याख्या शिक्षण म्हणजे 'स्व' ची ओळख होय. शिक्षण म्हणजे फक्त गभमन, शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा, मार्क, घोकंपट्टीही नव्हे. सध्या अनेकांच्या मनात स्वत:विषयी मी कोण ही जिज्ञासा असते. यालाच आपण आत्मज्ञान किंवा सॉक्रेटिसच्या शब्दात Know Theyself सर्वांना आपापला 'स्व' जाणायला साहाय्यकारी कलचाचणी उपयोगी ठरेल. मानव सर्व एकसारखा, तरी कोणी दोन माणसे एकसारखी नाहीत. अशी मानवी जीवनाची गमतशीर परिस्थिती आहे. कलचाचणीद्वारा 'स्व' ची ओळख म्हणजे स्वत:तल्या गुणांची जाणीव. Qualities म्हणजे सद्‌गुण किंवा दुर्गुण असे न म्हणता Self awareness आत्मभान आहे. हा आत्मज्ञानाचा मार्ग कल चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्याला दाखवला पाहिजे. यातून स्वत:चे शक्तिस्थान आणि अशक्तिस्थान, दोष नाही. दोष असा असतच नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या, स्वभावाच्या शक्तिस्थानावर भविष्याची इमारत सर्वक्षमतांनी उभी करावी. अशक्तिस्थानावर चिंतित होऊन चिडचिड करत वेळेचा अपव्यय करू नये. तसेच पालकांचा दबाव, प्रचलित अभ्यासक्रमाचे आकर्षण इत्यादीमुळे आपला निर्णय चुकू शकतो.

वरील सर्व बाबींचा विचार करता दहावी नंतरच्या टप्प्यावर प्रत्येक विद्यार्थ्याला करिअर निवडीबाबतचे सखोल मार्गदर्शन यातून मिळणार आहे.

याकरिता व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करतात. परंतु ह्या मार्गदर्शनाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना होऊ शकत नव्हता. शहरी विद्यार्थ्यांनाच या सुविधेचा लाभ प्राप्त होत होता. आता शासनाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न राज्यातील सर्व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना कलचाचणीद्वारे करिअर निवडण्यास मदत करण्याचा धोरणात्मक प्रकल्प साकार केला आहे. याबाबत शासन निर्णय १० नोव्हेंबर २०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

स्वत: विद्यार्थ्यांचा कल, ओढा कोणत्या क्षेत्राकडे आहे. याबाबत माहिती झाली तर करिअर निवडणे सुलभ होईल. या दृष्टिकोनातून कलचाचणी प्रकल्प हा ज्ञानी कौशल्यपूर्ण समाजनिर्मिती क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाकांक्षी असे दमदार पुढचे पाऊल होय.

### अ) कलचाचणीचा उद्देश :-

१. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्याला व्यवसाय मार्गदर्शन-सेवेद्वारे शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्राची निवड करण्यास मार्गदर्शन करणे.

२. विद्यार्थी व पालकांना विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांची माहिती देऊन जाणीवजागृती करणे.

### आ) कलचाचणीची संकल्पना :-

कल म्हणजे ओढा किंवा आवड असा शब्दकोशातील अर्थ आहे. इंग्रजीत ज्याला Inclination असे म्हणतात.

**इ) कलचाचणीची कार्यात्मक व्याख्या (Operational Definition) :-**

मानसशास्त्रीय कसोटीद्वारे विद्यार्थ्यांची करिअरविषयक अभिरुची मोजणे (To measure Vocational interest of Student through Psychological test.)

**ई) कलचाचणीचे स्वरूप :-**

यावेळी सुमारे सोळा लक्ष विद्यार्थ्यांची कल चाचणी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणार आहे. याकरिता महाराष्ट्र राज्य व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्थेने प्रमाणित केलेल्या मानसशास्त्रीय कसोटीचा (अभिरूप शोधिकेचा) वापर करण्यात येणार आहे. तिची विश्वसनीयता ०.८१ ते ०.९१ (संख्याशास्त्रीय उत्कृष्ट) आहे. प्रामुख्यानी पेपर पेन्सिल स्वरूपाच्या असलेल्या कसोटीचे रूपांतरण मंडळाने online मोडमध्ये केले आहे. ही चाचणी फेब्रुवारी २०१६ मध्ये सर्व दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता घेण्यात येणार आहे.

**उ) कल चाचणीविषयी महत्त्वपूर्ण बाबी :-**

ह्या चाचणीचा वेळ साधारणपणे ४० ते ५० मिनिटे असेल. कल चाचणीचा शाळेच्या अभ्यासाशी किंवा पास-नापासाशी काहीही संबंध नाही. याकरिता कोणताही अभ्यास करून येणे अपेक्षित नाही किंवा आवश्यकही नाही. या चाचणीचा विद्यार्थ्यांनी व पालकांनी कोणताही ताण घेऊ नये.

विद्यार्थ्यांने कोणतीही तयारी न करता अगदी सहजपणे ही चाचणी द्यावी. यातून केवळ मानसिक कल मोजला जाणार आहे. आपला खरा कल कळण्याच्या दृष्टीने ही कलचाचणी विद्यार्थ्यांने प्रामाणिकपणे व मनापासून सोडवावी. कलचाचणी हे भविष्यकाळातील करिअर निवडीचे दिशादर्शक साधन आहे.

या चाचणीतील निष्कर्षानुसार विद्यार्थ्याने कोणते अभ्यासक्रम, शाखा किंवा करिअरचे क्षेत्र निवडावे याबाबत मार्गदर्शन केले जाईल. तसा कल अहवाल विद्यार्थ्यांना दहावीच्या निकालासोबत दिला जाईल. त्यामध्ये विद्यार्थी व पालकांना करिअर निवडीच्या दृष्टीने कोणकोणत्या बाबी विचारात घ्यावात यांचे मार्गदर्शन केले जाईल. त्यासोबतच विद्यार्थ्यांचा कल ज्या क्षेत्राकडे असेल त्या क्षेत्रातील अभ्यासक्रमातील सविस्तर माहिती कल अहवालासोबत देण्यात येईल. त्यांच्या आधारे योग्य निर्णय घेण्यास विद्यार्थी व पालकांना मदत होईल. कल अहवालाची Soft copy संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल. यामुळे पालक व विद्यार्थी त्याविषयी सविस्तर माहिती गोळा करू शकतील. करिअर मार्गदर्शनासाठी त्यावर संपर्क साधून सखोल मार्गदर्शन घेता येईल किंवा वेळ पडल्यास व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई आणि त्यांची सर्व विभागीय, जिल्हास्तरीय संबंधितामार्फत समुपदेशन घेता येईल.

**ऊ) कलचाचणी कशासाठी (Rationale) :-**

१. युवकांची ऊर्जा विविध दिशांना वळवण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील आश्वासक संधीची विद्यार्थ्यांना माहितीच नसते. ती माहिती करून देणे हा कल चाचणीचा महत्त्वाचा उद्देश होय.

२. करिअर निम्चिती व निवडीतील गोंधळ / अज्ञान टाळण्यासाठी बऱ्याच वेळा खूप जास्त पर्याय समोर असतील. तर त्यातून योग्य निवड करणे कठीण होऊन बसते अशावेळी शास्त्रीय पद्धतीने कल जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

३. आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यावर निर्णय घेण्यास मदत व सुलभता येण्यासाठी करिअर ही जाणीवपूर्वक, व्यवस्थित विचार करून करण्याची

गोष्ट आहे. म्हणून हा निर्णय तेवढ्याच गांभीर्याने घेणे गरजेचे असते. याकरिता ही मार्गदर्शन सुविधा उपयोगी होईल.

४. युवांना कार्यानंद प्राप्तीसाठी आवडीचे क्षेत्र असेल तर काम करण्यासाठी विशेष कष्ट घ्यावे लागत नाहीत. तो कार्यानंदाचा भाग होतो म्हणून मनापासून आनंद होतो.

५. क्षेत्र समृद्ध करण्यासाठी आवडीच्या व निवडीच्या क्षेत्रात मनुष्य आपल्या संपूर्ण क्षमतेने काम करणे. पर्यायाने त्या क्षेत्रात भरीव कामगिरी करून ते क्षेत्र समृद्ध होते.

६. युवांच्या जीवनातील वैफल्य, नैराश्य आणि दु:ख टाळण्यासाठी आपला कल ओळखून त्या त्या क्षेत्रात प्रवेश घेतल्यास मन सहज रमते. पालकांनाही मुलाचा खरा कल समजल्यामुळे ते त्यांच्या इच्छा आकांक्षा मुलांवर लादत नाहीत. साहजिकच दु:ख, नैराश्य आणि वैफल्य टाळता येते.

७. उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी क्षेत्र आवडीचे असल्याने व्यक्ती पूर्ण क्षमतेने कार्य करते. त्यामुळे व्यक्तिगत उत्पादन क्षमता वाढते. व्यक्तीची क्षमता वाढली की पर्यायाने त्या संस्थेची, कार्यालयाची क्षमता वाढते. अंततः देशाची उत्पादन क्षमता वाढते.

८. शिक्षण, रोजगार व स्वयं रोजगारातील दरी कमी करण्यासाठी सुयोग्य करिअरची निवड प्रत्येकाने केल्यास अप्रत्यक्षपणे शिक्षण आणि रोजगार व स्वयंरोजगारातील दरी कमी होण्यास निश्चित मदतच होते.

९. व्यक्ति व करिअर क्षेत्र या दोन्हीवरील अन्याय टाळण्यासाठी Right Person Right Field हे समीकरण योग्यप्रकारे साध्य झाल्यास व्यक्ती व करिअर या दोन्हीवरील अन्याय टळतो. त्यामुळे विविध क्षेत्रांमधील गुणवत्ता सुधारते.

१०. मार्गदर्शन सुविधा सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी आज घडीला शहरी मुलांना जितक्या सहजपणे मार्गदर्शन मिळू शकते, तितक्या सहजपणे ग्रामीण भागातील मुलांना मिळण्यास अडचणी येतात. कलचाचणी प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थी ही सुविधा प्राप्त करून घेतात. अंततः प्रगतिशील महाराष्ट्राचे भविष्य ज्यांच्या हाती आहे, अशा भावी पिढीच्या आश्वासक भविष्यासाठी कलचाचणी प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मेडिकल, इंजिनिअरिंग, सायन्स, कॉमर्स, आर्ट, चित्रकला, नृत्य,गायन, संगीत, लेखन, शेती,उद्योग, अभिनय, वक्तृत्व,खेळ,समाजकारण, राजकारण इत्यादी सर्व क्षेत्रात सारखीच बुद्धिमत्ता लागते. ही सर्व अर्थपूर्ण करिअर क्षेत्रे आहेत याचे भान ही कलचाचणी आपणास देणार आहे. जन्माला येणारा प्रत्येक मानवी जीव बुद्धिमान आहेच. त्याची बुद्धी कोणत्या क्षेत्रात चालते ते क्षेत्र वेगवेगळे आहे. त्यामुळे 'स्व' ची ओळख म्हणजे आपल्यापाशी बुद्धी आहे हा आत्मविश्वास प्रत्येक विद्यार्थ्यात जागा करणे आणि ती बुद्धी कोणत्या क्षेत्रात चालते ते प्रत्येकाला कलचाचणी मधून जाणून घेता येईल, अशा दृष्टीने रचना तयार करण्यात आलेला हा महत्त्वपूर्ण प्रकल्प होय. दहावीनंतर कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा ही विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रमावस्था या प्रकल्पामुळे निश्चितच कमी होणार हे मात्र नक्की.

**संदर्भ सूची** १) दीपाली दिवेकर, (डिसेंबर २०१६) शिक्षण संक्रमणमधील लेख:प्रकाशक म.रा.मा.शिक्षण मंडळ, पुणे-४११ ००४.

२) धर्माधिकारी अविनाश (२१ जून २०१४) सा.सकाळमधील लेख: सकाळ पेपर्स प्रा.लि.प्रकाशन पुणे–४११००२.

३) पाईकराव विजयकुमार (यशवाणी वेबरेडीओवरील व्याख्यान यचममुवि नाशिक-४२२ २२२.